# पंडित नेहरु आणि धर्मनिरपेक्षता

प्रा. ए. बी. जाधव
राज्यशास्त्र विभाग
शहाजीराजे महाविद्यालय खटाव, जि. सातारा

**प्रस्तावना :**

पंडित नेहरु स्वांतत्र लढयातील लोकप्रियता नेते होते. स्वांतत्र्यानंतर १६ वर्षे ते भारताचे पंतप्रधान होते. जवाहरलाल नेहरु यांचे विचार समजून घेताना त्यांनी लिहिलेली पुस्तके, लेख, भाषने यामधून समजून घेता येतात. त्याचप्रमाणे पंतप्रधान म्हणून त्यांनी केलेल्या कामगिरीतून सुद्धा समजून घेता येतात. त्यांनी लिहिलेल्या ग्रंथामधील क्पेसवअमतल वि प्दकपंए आणि glimpses of the world History हे अत्यंत गाजलेले ग्रंथ आहेत. त्याप्रमाणे पार्लमेंटच्यासमोर त्यांनी केलेल्या भाषांचा संग्रह सुद्धा पसिद्ध आहे. त्यांनी लिहिलेल्या पत्रांचा संग्रह प्रसिद्ध आहे. या सर्वांमधून त्यांचे विचार समजून घेता येताता.

नेहरु दृष्टीआधुनिक होती. विज्ञाननिष्ठा राष्ट्रवाद विज्ञाननिष्ठा, राष्ट्रवाद, लोकशाही धर्मनिरपेक्षा, समाजवाद या आधुनिक तत्वांचा त्यांच्या विचारावर प्रभाव असल्रूाचे दिसून येते. स्वातंत्र्यानंतर या आधुनिक तत्वानुसार भारतिय समाजाची जडणघडण करण्याचा त्यांनी शेवटपर्यंत प्रयत्न केला. आणि त्यामध्ये अर्थातच लोकशाही शासनाला बाहय देशामध्ये रुजविण्याचाही प्रयत्न केला.

धर्मनिरपेक्षता हे जवाहरलाल नेहरु याच्या विचारातच एकमूलतत्व आहे. तवेच भारतिय राज्यघटनेचेही मूलतत्वे आहे. नेहरुंच्या विचारावर आधुनिक विचारांचे संस्कार झालेले होते. बुद्धीनिष्ठताआणि आधुनिक दृष्टि ही त्यांच्या विचारांसाठी वैशिष्टये होती. त्यामुळे ते धर्मनिरपेक्षता तत्वाचे पुरस्कर्ते बनले. राज्यघटनेने स्विकारलेले धर्मनिरपेक्षता तत्वाचे पुरकर्ते बनले. राज्यघटनेने. स्विकारलेले धर्मनिरपेक्षतेचे तत्व भारतिय समाजामध्ये रुजावे यासाठी ज्या नेत्यांनी प्रयत्न केले. त्यामध्ये नेहरुंचा सहभाग होता.

प्रस्तुत लेखांमध्ये पंडित नेहरुंची धर्मनिपेक्ष कल्पना, धर्मनिरपेक्षेतेविषयी दृष्टिकोन यासंबंधनी चर्चा केली जाणर आहे.

**धर्मनिरपेक्ष संकल्पना :**

कोणत्या धार्मिक वर्चस्वापासून राजकीय व सामाजिक व्यवस्था मुक्त धर्मनिरपेक्ष तत्वाचे मुख्य ध्येय आहे. धार्मिक स्वातंत्र, धर्मपरिवर्तनाचा अधिकार सर्व धर्मयांमध्ये समानतेचे रक्षण हे धर्मनिरपेक्षतेचे प्रमुख कार्य आहे.

धर्मनिरपेक्षतेला इंग्रजी भाषेत 'secular' असा शब्द आहे. 'secular' हा शब्द भाषेतील 'Saeculum' या शब्दापासून निर्माण झाला. त्याचा अर्थ वर्तमान वेळ असा आहे. 'ऐहिक जग' असाही अर्थ होतो. धर्मनिपेक्षतेचे तत्वानुसार जगातील सर्व लोक या पृथ्वीवरील ऐहिक जगात राहतात. एनसायक्लोपेडिया ब्रिटेकानिकामध्ये याचा अर्थ सांगितला की,

" कोणतीही वस्तु जी अध्यामिक नसेल, धर्माशी किंवा अध्यामिक विषयांशी संबंधित स्पष्टपणे विरोधी असेल, संबंधतीत नसेल, धर्म किंवा चर्च यांच्याहून अधार्मिक, आध्यात्मिक किंवा धर्मसंस्था विरोधी असेल. "

थोडक्यात, धर्मनिरपेक्षता धर्माच्या विरूध्द किंवा धर्माशी संबंधीत नसलेल्या धारणेला म्हटले जाते.

नेहरूंच्या मते, भारतही एक अनेक धर्माची जन्मभुमी हिंदु, बौध्द, जैन, ख्रिस्ती, इस्लाम, ज्यू, पारसी इत्यादी धर्मपंथ यथे संन्मानाने वागत आले आहेत. प्रत्येकाला आपल्या धर्मानुसार आचरण करण्याचे स्वातंत्र आजच मिळाले नाही तर ते पुर्वीपासुन मिळते आले आहे. भारतात भागौलिक एकता, राजकीय स्थिरता व राष्ट्रीय ओळख हि केवळ धर्मनिरेपक्षतेच्या तत्वांचा स्वीकार केल्यासच शक्य आहे. धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वावर नेहरूंचा

ठाम विश्वास होता. त्यांच्यासाठी धर्मनिरपेक्ष व्यवस्था जीवन जगण्याचा मार्ग होता. धर्मनिरपेक्षता म्हणजे प्रेम, सहानुभूती, मानवता या धार्मीक तत्त्वांना प्रत्यक्षात आणण्याचा मार्ग आहे.

एखाद्या देशातील वेगवेगळया धर्माचे लोक आपआपल्या धर्माचे पालन करता करता आपल्या देशाच्या एकतेचे रक्षण करू शकतात. नेहरूंचे धर्मनिरपेक्षतेचे विचार महत्वपूर्ण आहेत. ते उदार मतवादाशी आधारीत आहेत. नेहरू जीवनाविषयी म्हणतात. – 'खरेतर मला याच जगाची याच जीवनाची आवड आहे. एखादे दुसरे जग किंवा एकभवी जीवनाची नाही. आत्म्यासारखी एखादी गोष्ट आहे किंवा नाही किंवा मृत्यूनंतरही काही जीवन असते की नाही हे मला माहित नाही. जरी हे महत्वाचे प्रष्न असले तरी मला जराही चिंतीत करत नाहीत,' नेहरू कोणत्याही अशा अज्ञात सर्वश्रेष्ठ शक्तीची कल्पना करू शकत नव्हते. जी साकार असेल.

नेहरू धर्मविरोधी होते असे नाही तर ते धर्मनिरपेक्षतेचा पुरस्कार करणारे होते. मावतावादी विचारांचे होते. दुःखी, दीन-दुबळयांसाठी त्यांचे प्रेम तर जगप्रसिध्द आहे.

**धर्मनिरपेक्षते विशयी नेहरूंचा दृष्टिकोन :**

नेहरू धर्म, धार्मिकता, परंपरा यांचा विचार करताना भारताचे हजारे वर्षांचे सातत्य, बदलत जाणाऱ्या परंपरा टिकून राहण्याची शक्ती या साऱ्या बाबींचे संदर्भ मनात धरून वाचन मानव निर्मित ग्रंथ म्हणून करावे अषी त्यांची दृष्टी होती. ते धर्मग्रंथाचे वाचन मानव निर्मित ग्रंथ पुरस्कार करणारे होते. मानवतावादी विचरांचे होते. त्यांच्या मते, "मला तर जवळपास नेहमी हेच जाणवते की, अंधविश्वास व प्रगतीविरोधी जर सिध्दांत आणि कट्टपणा, अंधश्रध्दा आणि शोषण यांनी " स्थापलेल्या स्वार्थाच्या रक्षणाचे नाव धर्म आहे."[२] यावरून त्यांची धर्माविषयीची वैज्ञानिक व तारखीक बुध्दी सहजपणे समजून येते.

भारताची धार्मीक, वंशीक भाषीक विविधता लक्षात घेता तसेच जाती व्यवस्था लक्षात घेता भारताची उभारणी कोणत्याही धर्माच्या तत्वावर होता कामा नये यासाठी धर्मनिरपेक्ष राज्य पाहिजे. नेहरूंची धर्मनिरपेक्षतेची कल्पना धर्म आणि शासन यांची फारकत करणारी होती. नेहरू धर्माला राजकारणापासून वेगळे मानत होते. राजकारणात धर्माचा हस्तक्षेप नसावा असे त्यांना वाटे. धर्माच्या नावाखाली राजकारणी लोक दंगे घडवून आणतात याला त्याचा विरोध होता ते म्हणत, " हिंदुस्थानात सर्व गोष्टींपेक्षा जास्त धार्मिक देश समजला जातो आणि हिंदु मुसलमान आणि शीख तसेच दुसरे लोक आपापल्या मतांचा अभिमान बाळगातात आणि एकमेकांचे डोके फोडुन त्यांच्या खरेपणाचा पुरावा देतात. हिंदुस्थानात आणि दुसऱ्या देशामध्ये धर्माच्या दृश्यानी मला भयभीत केले आहे. मी त्याची बऱ्याचदा निंदा केली आहे. आणि त्यांना मुळापासून उपटुन टाकण्याची इच्छा व्यक्त केली आहे. "[३]

**धर्मनिरपेक्ष राज्याची कल्पना :**

धर्मनिरपेक्ष राज्य ही आधुनिक संकल्पना आहे धर्माचा राज्याशी संबंध कोणत्या प्रकारचा आहे यावरून धर्माधिष्टीत व धर्मनिरपेक्ष असे दोन प्रकार पडतात. धर्माधिष्टीत राज्यामध्ये वरीष्ठ धर्म हा राज्याचा धर्म म्हणून घोषीत करण्यात आलेला आहे. त्या विशिष्ट धर्माच्या अनुयायांना राज्याची सत्ता वापरण्याचा अधिकार असतो इतर धर्मीयांना दुय्यम स्थान दिलेले असते याऊलट धर्मनिरपेक्ष राज्यामध्ये कोणताही धर्म हा राज्याचा धर्म म्हणून घोषित केलेला नसतो. धार्मिक कारणावरून व्यक्ती व्यक्तींमध्ये भेदभाव केला जात नाही. सर्व धर्मीयांना समान हक्क व स्वातंत्र्य असते आणि व्यक्तीला आपल्या इच्छेप्रमाणे कोणत्याही धर्माचे पालन करण्याचे स्वातंत्र्य असते. धर्मनिरपेक्षता या तत्वाचा उदय युरोप मध्ये झाला आणि नंतर त्याचा प्रसार इतर देशामध्ये झाला जगातील सर्व प्रगत आणि आधुनिक देशांनी हे तत्व आत्ता स्वीकारलेले आहे. विशेषतः लोकशाही देशात या तत्वाचा स्वीकार करणे अपिहार्य असते. कारण धार्मीक किंवा इतर कोणत्याही कारणावरून व्यक्ती व्यक्तीत भेदभाव करणे ही गोष्ट लोकशाही तत्वास विसंगत ठरते. भारतामध्ये लोकशाही पध्दत असल्यामुळे राज्य घटनेने धर्मनिरपेक्षतेचे तत्व स्वीकारले. पण या तत्वाचा स्वीकार होणे ही विशेष महत्वाची गोष्ट होती. त्याचे कारण भारताच्या सभोवतालचे सर्व देश धर्माधिष्टित होते. देशाची फाळणी धार्मिक कारणावरून झाली तसेच स्वातंत्र्यपूर्व काळापासून भारतीय

राजकारणामध्ये धार्मीक प्रश्नांना महत्व होते. हिंदू, मुस्लीम, सीख अशा सर्व देशांमध्ये धर्मादायी संघटना उदयाला आल्या आणि धार्मिक कारणावरून संघर्ष होत होते अशा प्रकारे स्वातंत्र्यपूर्व काळापासून चालत आलेली धर्मवादी गटाचे राजकारण धर्मावर आधारीत देशाची फाळणी, सभोवतालची धर्माधिष्टित राज्ये अशी परिस्थिती होती. "भारतात चार मोठया धर्माचा प्रभाव पडला आहे. हिंदू आणि बौध्द धर्माचा उदय, भारताच्या स्वतःच्या विचारामधून झाला तर क्रिश्चन व इस्लाम धर्म बाहेरून आले परंतु ते भारतात भक्कमपणे रूजले आहेत."[४] अशा प्रकारे भारतामध्ये सर्व धार्मीक समुह एका राष्ट्राचे घटक म्हणून नांदत आहेत. आणि इथून पुढे हीच परंपरा भारतात सुरू राहिली पाहिजे. अशी नेहरूंची भुमिका होती.

भारतीय समाजात धर्मनिरपेक्षता रूजवण्याच्या कार्यात धर्मनिरपेक्ष राज्य घटना तयार करणे ही आवश्यक गोष्ट होती घटनेने सर्वांना धार्मिक स्वातंत्र्य दिले आहे पण त्याच बरोबर सार्वजनीक सुव्यवस्था, नितिमत्ता आणि आरोग्य या दृष्टिने धार्मिक आरणावर बंधने घालण्याचा अधिकार सरकारला दिला आहे. काही वेळा धार्मिक रूढी समाज हिताला बाधक असतात. काही आरोग्याला धोकादायक असतात, काही नितिमत्तेच्या दृष्टीने अयोग्य असतात अशा बाबतीत सरकारला आलिप्त राहून चालत नाही तर कायद्यान त्याला प्रतिबंध करणे आवश्यक ठरते. नेहरूंना याची जाणिव होती धर्मावर आधारित जुन्या रूढी नाहीश्या करून सर्वांसाठी समान कायदा आमलात आणण्यासाठी त्यांनी प्रयत्न केला "हिंदू कोड बिल" हे त्याचे उदाहरण होय. त्याचबरोबर त्यांनी धर्मवादी राजकारण करणाऱ्या संघटनांना विरोध केला नेहरू त्यांच्या वैयक्ति जीवनात धार्मिक नव्हते निरनिराळया धर्माच्या विचारी भारतीयांचे आचरण पाहुनही आपणास कधी धर्माचे आकर्षण वाटले नाही असे त्यांनी नमुद केलेच, पण जीवनात समस्यांकडे पाहण्याचा, अंध्दश्रध्दा, कर्मकांड यांच्या प्रभावाखाली धर्माचा दृष्टिकोन वैज्ञानिक असत नाही असे ही ते मानत.[५] वैयक्तिक आणि सार्वजनीक जीवनात विज्ञान व विवेक यांची कास धरली तर भारत आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करून सर्वांगीन प्रगती करत मानाचे स्थान मिळवू शकेल असे त्यांना वाटत असे.

**समारोप :**

नेहरूंच्या अपेक्षेनुसार जास्तीत जास्त सामाजिक जीवन अधिकाधिक धर्मनिरपेक्ष व्हायला पाहिजे होते व व्यक्तीगत जीवनात ही त्याचे प्रतिबिंब निवडीमध्ये उत्तरोत्तर वाढलेले दिसायला हवे होते. नेहरू नंतरच्या काळातील राजकीय नेतृत्व, विकासातील असमतोल, जातीय अस्मिता या सर्वातून भारत तग धरून आहे. राज्य व धर्म यांची विभागणी कायम आहे नेहरूना अभिप्रेत असणारी धर्मनिरपेक्ष संकल्पना आजही अस्तित्वात नाही व अस्तित्वात येण्याची शक्यता वाटत नाही.

**संदर्भः**

१. जवाहरलाल नेहरू, द. डिस्कव्हरी ऑफ इंडिया, मेरिडीयन बुक, लंडन, १९४५, पृ. १३
२. जवाहरलाल नेहरू, डिस्कव्हरी ऑफ इंडिया पृ. ३१०
३. जवाहरलाल नेहरू, ॲण्ड ॲटोबायोग्राफी, पृ. ६११
४. उमा अय्यंगार व ललिता झकारीया, टुगेदर द फॉट, नेहरू गांधी करन्सपॉन्डस, १९२१-४८, ऑक्सफोर्ड, २०११ पृ. ७४
५. जवाहरलाल नेहरू, द. डिस्कव्हरी ऑफ इंडिया मेरिडीयन बुक, लंडन, १९६० पृ. ११-१२.